दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनिल पोतदार

• वर्ष १५ वे • अंक ३३८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.३ मार्च २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## शेतकऱ्यांना पुरेशी वीज देणे हीच आमची प्राथमिकता : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शेतकरी बांधवांना दिवसा आणि पुरेशी वीज देणे शासनाची प्राथमिकता असून, महाकृषी ऊर्जा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. महाकृषी ऊर्जा अभियानांतर्गत कृषी ऊर्जा पर्वाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते विधान भवनात करण्यात आला.

सर्व देश, राज्य लॉकडाऊन असताना शेतकरी बांधव मात्र कर्तव्यावर होते, असे सांगून मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बहुतांश कार्यालयीन कामे वर्क फ्रॉम होमच्या माध्यमातून केली जात होती. शेतकऱ्यांनी लॉकडाऊन केले असते, तर कठीण परिस्थिती निर्माण झाली असती. इतरांसाठी मळे फुलवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात काटे येऊ नयेत, यासाठी त्यांच्या पाठीमागे सरकार ठामपणे उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री ठाकरे यांनी दिली.

### सामाजिक कार्यकर्ते आणि दैनिक रायगड नगरीचे मुख्य संपादक...

# सुनील पोतदार यांचे शिवभोजनाबाबत मुख्यमंत्र्यांना साकडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दैनिक रायगड नगरीचे संपादक सुनील पोतदार हे गेले अनेक वर्षे सामाजिक आणि राजकीय चळवळीत काम केलेले आहेत. त्यामुळे त्यांना रायगड जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्रातील जन–तेची विशेषतः गरिबांच्या प्रश्नांची जाणीव आहे. त्यासाठी मुख्यमत्रांच्या नेतृत्वाखाली गरीबांसाठी सुरू केलेल्या एक वेळ शिवभोजनाच्या निर्णयाचे कौतुक केले होते. राज्यात शिवभोजन केंद्राची केंद्र चालकांना मिळणारी बिले ही त्या जिल्ह्याच्या पुरवठा शाखेकडून दिली जात आहेत. परंतु जिल्ह्याचे ठिकाण हे शेवटच्या तालुक्यापर्यंत सुमारे २०० पेक्षा जास्त किमी अंतर असल्यामुळे केंद्र चालकांना बिलासाठी जाण्याचे खर्चिक पडत आहे. त्यातच अनेक जिल्ह्यात गेले सहा महिन्यांपासून बिले न मिळाल्यामुळे केंद्र चालक यांना व्यवसाय करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे व बिलासाठी महिन्यातून दोन ते तीन वेळा जिल्ह्याच्या ठिकाणी गेल्यास ती खर्चिक बाब आणि वेळेचा अपव्यय होत आहे म्हणून पोतदार यांनी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांना एक विनंती पत्र पाठवून त्या त्या तालुक्यातील शिवभोजन चालकांची बिले तहसीलदार यांच्या मार्फत देण्याबाबत विनंती केली आहे.



शिवभोजन केंद्र चालकांना जर वेळेवर बिले मिळाली नाहीत तर केंद्रे बंद होऊ शकतात व त्यामुळे विरोधकांना ते आयतेच कोलीत मिळून राज्य शासनाच्या शिवभोजन योजना चालवू शकत नाही असा गवगवा करण्याचा मार्ग मोकळा होवू शकतो. म्हणून याचा सारासार विचार करून केंद्र चालकांची बिले तालुकास्तरावर तहसीलदारांनामार्फत बिले देण्याची विनंती मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांना दिलेल्या पत्रात केली आहे.

याबाबत मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देताना सुनील पोतदार हे रायगडचे रहिवाशी असल्यामुळे त्यांनी रायगडचे जिल्हाधिकारी कार्यालय हे अलिबाग येथे आहे. अलिबाग ते पोल–ादपूर तसेच अलिबाग ते श्रीवर्धन हा सुमारे १५० ते २०० किमीचा पल्ला आहे. अलिबाग पासून इतर तालुके ही १५० किमीच्या आसपास असल्यामुळे सहा महिन्यांपासून शिवभोजन केंद्र चालकांची बिले न मिळाल्याने त्यांना पोलादपूर ते अलिबाग, श्रीवर्धन ते अलिबाग, कर्जत ते अलिबाग, उरण ते अलिबाग अशा विविध तालुक्यातून अलिबाग येथे जाण्यासाठी खर्च व वेळ वाया जात आहे. म्हणून त्या त्या तालुक्यात तहसीलदारांना शिवभोजन केंद्र चालकांची बिले काढण्याचा अधिकार दिल्यास चालकांचा वेळ व आर्थिक खर्च वाचू शकतो. म्हणून या बाबत मुख्यमंत्री महोदयांनी सारासार विचार करून योग्य निर्णय घ्यावा अशी विनंती पोतदार यांनी केली आहे.

## संक्षिप्त...

### निवडणुकांमध्ये भाजप विरोधात प्रचार : शेतकरी संघटना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्राच्या तीन नवीन कृषी कायद्यांविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. आता शेतकरी संघटनांनी केंद्रातील सत्ताधारी भाजपला घेरण्याची तयारी सुरू केली आहे. ४ राज्ये आणि एका केंद्राशासित प्रदेशात विधानसभा निवडणुका होत आहेत. या निवडणुकांमध्ये आता भाजपविरोधात शेतकरी संघटना प्रचार करणार आहेत.

पुढच्या महिन्यांत पश्चिम बंगाल, तामिळनाडू, पुदुचेरी, केरळ आणि आसाममध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत. भाजपने निवडणुकीत मोठी शक्ती लावली आहे. यामुळे पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेससमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. अशातच कृषी कायद्यांविरोधात आंदोलन करणाऱ्या संयुक्त किसान मोर्चाने मोठी घोषणा केली आहे. भाजपला मतदान करू नका, असं आवाहन पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमध्ये करणार असल्याची घोषणा शेतकरी संघटनांनी केली आहे. १० कामगार संघटनांसोबत आमची बैठक झाली. सरकारी कंपन्यांच्या खासगीकरणाविरोधात १५ मार्चला कामगार आणि कर्मचारी रस्त्यांवर उतरतील आणि रेल्वे स्थानकांबाहेर धरणे आंदोलन करतील. सरकार शेतकऱ्यांचे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न करत आहे. पण केंद्र सरकारमध्ये हरयाणाचे जे ३ केंद्रीय मंत्री आहेत त्या मंत्र्यांना त्यांच्या गावात प्रवेश बंदी केली जाईल, असा इशारा स्वराज इंडियाचे संस्थापक योगेंद्र यादव यांनी दिला. संयुक्त किसान मोर्चाची आज बैठक झाली. या बैठकीत १५ मार्चपर्यंतच्या आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली. शेतकऱ्यांच्या आंदोलनाला ६ मार्चला १०० दिवस पूर्ण होत आहेत. त्या दिवशी शेतकरी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत कुंडली–मानेसर–पलवल एक्स्प्रेस वेवर वेगवेगळ्या ठिकाणी रास्ता रोको करतील, असं योगेंद्र यादव म्हणाले.

## वाचनालय एक आदर्श साहित्य वास्तू : लोकनेते रामशेठ ठाकूर

### के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयाच्या उत्कर्षासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून ०२ लाखांची मदत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय हे नवोदित तसेच होतकरू साहित्यिक, कवी, लेखक यांना नेहमीच प्रोत्साहित करीत आहेत, त्या अनुषंगाने या वाचनालयाचा अधिक उत्कर्ष व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज(दि. ०२ मार्च) ०२ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

पनवेलच्या साहित्यिकांच्यावतीने मराठी भाषा दिनानिमित्त व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७० व्या वाढदिवसानिमित्त पनवेलमधील साहित्यिकांची ७० पुस्तके लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते के. गो. लिमये वाचनालयाला भेट देण्यात आली. त्यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर ठाकूर यांनी या वाचनालयाच्या प्रति आपले भावनिक नाते असल्याचे स्पष्ट करत या वाचनालयातून आणखी साहित्यिक, लेखक, कवी निर्माण होतील असा विश्वास व्यक्त करीत वाचकांसाठी हे वाचनालय एक आदर्श साहित्य वास्तू असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमास सुप्रसिद्ध गझलकार ए. के. शेख, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, साहित्यिक प्रा. चंद्रकांत मढवी, ज्योत्स्ना राजपूत, गणेश म्हात्रे, रामदास गायधने, नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य श्याम पुंडे, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष महेंद्र पाटील, के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयाच्या सहचिटणीस जयश्री शेटये, ग्रंथपाल निकिता शिंदे, पत्रकार रमेश भोळे, सुमंत नलावडे, लक्ष्मण ठाकूर आदी उपस्थित होते. यावेळी सुप्रसिद्ध गझलकार ए. के. शेख यांनी म्हंटले कि, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा यंदा ७० वा वाढदिवस साजरा होत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमीच साहित्यिक, कवी. लेखकांना प्रोत्साहन देत असतात. साहित्यिकांबद्दल त्यांना आस्था असून या नगरीचे ते पालक आहेत.

कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पन–वेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी आपल्या प्रास्तविकात सांगितले कि, कवी, लेखक, साहित्यिक आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जवळचे नाते आहे. साहित्यिक वारसा पुढे चालत रहावा यासाठी वाचनालयीन पुस्तके भेट देत आहोत असे सांगून हा साहित्यिकांसाठी आगळा–वेगळा उपक्रम आल्याचा आवर्जून उल्लेख केला. यावेळी के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयाच्या सहचिटणीस जयश्री शेटये, ग्रंथपाल निकिता शिंदे यांनी वाचनालयाच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केलेल्या ०२ लाख रुपयांच्या मदतीबद्दल आभार व्यक्त केले.

## रानसई धरणाची पाणी पातळी खालावली ; ६४ दिवस पुरेल इतकंच पाणी शिल्लक

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई धरणातील पाण्याची पातळी खालावली असून नागरिकांना फक्त पुढील ६४ दिवस पुरेल इतकाच पाणी साठा उपलब्ध आहे. त्यामुळे उरणकरांचा पाणी पुरवठा या आठवड्यापासून मंगळवार आणि शुक्रवार असा दोन दिवस बंद ठेवणार येणार असल्याची माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उरण विभागाचे प्रभारी उप अभियंता रंजित काळेबाग यांनी दिली आहे.

उरणकरांची तहान भागवण्यासाठी तालुक्यातील रानसई एकमेव धरण आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत असलेल्या या रानसई धरणातुनच उरण तालुक्यातील ३७ ग्रामपंचायती, उरण नगरपरिषद आणि परिसरातील काही औद्योगिक कंपन्यांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र या वर्षी रानसई धरणात येत्या एप्रिल महिन्यापर्यंत नागरिकांना पुरेल इतकाच ६४ दिवसांचा पाणीसाठा उपलब्ध आहे.

त्यातच कडक उन्हाच्या तडाख्याने रानसई धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे धरणातील पाण्याची पातळी आणखीनच कमी होण्याची शक्यता आहे.त्याशिवाय मागील वर्षात पावसाचे प्रमाणही ..../२



## बोरघाटात कारला अपघात ; ३ जखमी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रं.४ वर बोरघाटात प्रवासी कारला अपघात झाला.

पुणे हुन मुंबई कडे जात असणारी प्रवासी कार क्रं. एमएच०१–सिव्ही–४३०३ ४.१५ वाजेच्या सुमारास खोपोली सायमाळ गावचे हद्दीत टाटा पावर हाऊसचे वळणावर आलेवेळी ब्रेक न लागल्याने कार वरून चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या बाजूला लोखंडी डीवाईडरला तोडून एका झाडाला धडकून अपघात झाला आहे. या अपघात दोन जणांना किरकोळ स्वरूपात दुखापती झाली तर एक महिला हर्षदा दिलीप भोर, वय २३ वर्ष ही जखमी झाल्याने प्रथम उपचार दळवी हॉस्पिटल खोपोली येथे घेऊन पुढील उपचार वाशी येथे घेत आहेत.



## मेगा भरतीसाठी बनावट कंपनीला कंत्राट दिल्याबाबत आ.प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळ सेवेतील मेगा भरतीसाठी बनावट कंपनीला कंत्राट दिल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सक्षम करण्याऐवजी महाआयटी विभागाने शासनाच्या सरळ सेवेतील मेगा भरतीसाठी परिक्षा प्रक्रिया राबविण्यास पात्र ठरविलेल्या चार खाजगी कंपन्यांपैकी दोन कंपन्यांचा काळ्या यादीत समावेश असल्याची बाब डिसेंबर २०२० मध्ये निर्दर्शनास आली आहे. चारपैकी एका कंपनीला उत्तर प्रदेश शासनाने मे २०१९ मध्ये तर दुसऱ्या एका कंपनीला महाराष्ट्र राज्य परिषदेने जून २०२० मध्ये काळ्या यादीत टाकले असल्याचे निर्दर्शनास आले आहे. तसेच शासनाच्या विविध विभागांमधील अराजपत्रीत पदांवरील भरती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सकारात्मक प्रतिसाद दिला असतानाही हि भरती प्रक्रिया खाजगी संस्थेच्या माध्यमातून करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आल्यावर 'एमपीएससी स्टुडंट्स राईट्स' या विद्यार्थी संघटनेच्यावतीने ' खाजगी संस्थेऐवजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फेच परिक्षा घेऊन भरती करावी' अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे केली होती काय असा सवाल करून देशातील विविध प्रकारच्या परिक्षा घेणाऱ्या विश्वासू कंपन्यांना डावलून उत्तर प्रदेश शासन व महाराष्ट्र राज्य परिषदेने काळ्या यादीत टाकलेल्या दोन कंपन्यांची शिफारस करण्यात आल्याने या प्रकरणी शासन त्वरित चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे त्याचबरोबर राजपत्रित पदांवरील भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली, असा सवालही आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केला.



या प्रश्नावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या लेखी उत्त–रात सांगितले कि, महाआयटीने पाठविलेल्या माहितीनुसार महाआयटी यांनी प्रसिद्ध केलेल्या निविदेत भाग घेतलेल्या सर्व कंपन्यांची तांत्रिक पडताळणी अतिशय काटेकोर पद्धतीने पार पाडण्यात आली आहे. तांत्रिक पडताळणी करीत असताना काळ्या यादीत नावे आढळलेल्या कंपन्या निविदा प्रक्रियेतून वगळण्यात ..../२

## बेकायदेशीररित्या अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमास अटक

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मौजे थेरोंडा फाटयाजवळ एक इसम हा मानवी शरिरावर दुष्परिणाम करणारा'गांजा' नावाचा अंमली पदार्थ बेकायदेशिररित्या विक्री करीता येणार असल्याबाबत स्थनिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील पोलीस हव–ालदार/राजेश पाटील यांना गोपनिय बातमीदारामार्फत खात्रीशिर बातमी मिळाल्याने पोलीस अधिक्षक अशोक दुधे, अपर पोलीस अधिक्षक सचिन गुंजाळ यांचे मार्गदर्शनानुसार दयानंद गावडे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड यांच्या नेतृत्वाखाली छापा कारवाई करीता स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील सपोनि/एस.एस.नावले व पोलीस अंमलदार यांचे पथक तयार करण्यात आले.

नमुद पथकाने मिळालेल्या गोपनिय बातमीदारामार्फत सविस्तर माहिती काढुन मौजे थेरोंडा फाटा येथे छापा टाकला असता इसम नामे अशिष नंदकुमार तळेकर, वय ५० वर्षे, रा. थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड, हा मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन कायदेशिररित्या त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्या कब्जात तब्बल ८ किलो, ४०० ग्रॅम वजनाचा गांजा नावाचा अंमली पदार्थ व ७५०/– रूपये रोख रक्कम असा एकुण १,०१,५५०/–रू



किंमतीचा मुददेमाल मिळुन आला.सदर मुददेमालासह आरोपीस ताब्यात घेवुन यशस्वीरित्या छापा कारवाई करण्यात आली असुन सदर इसमाविरूध्द रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक/चिमडा नेमणुक रेवदंडा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

## पोलीस असल्याची बतावणी करून दोघा जणांना लुटले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस असल्याची बतावणी करून दोन वेगवेगळ्या घटनेत दोघा जणांना लुटल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे.

देवीदास विठ्ठल बैकलवाड (३२) रा.दापोली, पारगाव हे मोटार सायकलवरुन चिंचपाडा ते पनवेल असे असताना करंजाडे वसाहत परिसरात एका मोटार सायकलवरुन आलेल्या अज्ञात इसमाने त्यांची गाडी थांबवून आपण पोलीस असल्याचे सांगून या परिसरात ५० हजार रुपयाची चोरी झालेली आहे असे सांगून सदर तोतया पोलिसांनी त्यांच्या खिशात ठेवलेली रक्कम काढून दाखविण्यास सांगितले व हातचलाखीने त्यांच्या खिशातील १५ हजार रुपये काढून घेवून पसार झाला आहे.

या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसर्या घटनेत खारघर येथे राहणारे राजेंद्र यादव (४७) हे सेक्टर ३५ वरुन सेंट्रल पार्कच्या फुटपाथवरुन पायी चालत जात असताना पाठीमागून मोटार सायकलवरुन आलेल्या इसमाने आपण पोलीस असल्याची बतावणी करून त्यांच्या गळ्यातील १ लाख रुपये किंमतीची सोन्याची चेन एका कागदात काढून ठेवण्यास सांगितले व हातचलाखीने सदर चेन घेवून ते पसार झाले आहेत.

याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पोलादपूर तालुक्यात १५ दिवसांत महाबळेश्वर-वाई मार्गालगत दुसरे अनोळखी पुरूषाचे प्रेत ; पोलीसांसमोर तपासाचे आव्हान

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गापासून महाबळेश्वर वाई सुरूर हा महामार्ग पोलादपूर शहरापासून सुरू होत असून गेल्या १५ दिवसांमध्ये या महामार्गावर दुसरे अनोळखी पुरूषाचे प्रेत आढळून आले. यापूर्वी पोलादपूर तालुक्यातील कुंभळवणे येथे एका अज्ञात पुरूषाचे प्रेत आढळून आले होते. या दोन घटनांमुळे पोलादपूर पोलीसांसमोर तपासाचे आव्हान उभे ठाकले आहे.

१८ फेब्रुवारी २०२१ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ४० वर्षे वयाचा मजबूत बांधा, काळा वर्ण, डोक्यावर काळे तुरळक केस, उंची १६० से.मी., अंगावर सफेद, राखाडी, काळ्या पट्ट्या असलेले टीशर्ट, आंतमध्ये तपकीरी रंगाची बनियन तसेच चौकडीची हाफ पॅण्ट असा वेश परिधान केलेला तर डोक्याचे केस गळलेले असल्याने जुन्या जखमेचे व्रण डोक्यावर दिसून येत असल्याचे वर्णन आहे. हे प्रेत आढळून आल्याची फिर्याद पायटे येथील तानाजी निकम यांनी पोलादपूर पोलीसांना दिली असून या संदर्भात अकस्मात मृत्यू रजिस्टरनुसार पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

या घटनेनंतर साधारणपणे केवळ १५ दिवसांच्या अंतराने दि. १ मार्च २०२१ रोजी पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे धरणाच्या पात्रामध्ये पुढील बाजूला पाण्यामध्ये उघड्या अंगाचा पुरूषाचा मृतदेह तरंगत असल्याचे दिसून आल्याने मोरगिरी निकमवाडीतील विश्वास निकम यांनी फिर्याद दिली. यावेळी सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरिक्षक ए.पी.चांदणे यांनी सहकाऱ्यांसमवेत घटनास्थळी भेट दिली. या घटनेचा तपास पोलीस उपनिरिक्षक लोणे करीत आहेत.

पोलादपूर तालुक्यात चार–पाच वर्षांपुर्वी कशेडी घाट, आंबेनळी घाट परिसरामध्ये अनेक बेवारस अज्ञात मृतदेह आढळून आले होते.

यापैकी काही मृतदेहांचा तपास अर्ध्यावर रखडला तर काही अज्ञात मृतदेहांची ओळख पटल्यानंतर तो खुन असल्याचेही निष्पन्न होऊन आरोपीस अन्य देशांचा आश्रय घ्यावा लागल्याच्या घटना झाल्याचे तपासाअंती दिसून आले आहे. त्यामुळे या दोन अज्ञात मृतदेह आढळण्याच्या घटनांनंतर पोलादपूर पोलीसांसमोर तपासाचे कडवे आव्हान उभे राहिले आहे.

# रामदास पाष्टे यांनी फुलांच्या शेतीतून शोधली स्वयंरोजगाराची वाट



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील भोईघर ग्रामपंचायत हद्दीतील काजुवाडी येथील शेतकरी रामदास पांडुरंग पाष्टे यांनी आपल्या परिस्थितीवर मात करून आपल्या कडे असलेल्या शेतात तीन गुंठे क्षेत्रात फुलांची शेती फुलवून स्वयंरोजगाराची यशस्वी वाट शोधली असल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

तालुक्यातील भोईघर ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या दुर्गम भागात रामदास पाष्टे यांनी फणसाड धरणाच्या जवळ काजुवाडीतील आपल्या शेतातील तीन गुंठे क्षेत्रात झेंडूची(गोंड्याची) फुलांची व तीन गुंठे जमिनीत शेवंती पिकवली असून तीन गुंठ्यांत मका, एक गुंठ्यांत भुईमूग व एक गुंठ्यांत रताळी चे पीक घेतले आहे.त्यांनी सन.२०१६ मधे अलिबाग–वाडगांव येथील नातेवाईक महादेव पाष्टे यांच्या कडून शेवंतीची तीनशे रोपे आणून लावली होती.सन.२०१७ मधे नंतर एक गुंठ्यांत रोपे लावली हीच रोपे जागेत तयार करून यंदा तीन गुंठ्यांत रोपे लावण्यात आली आहेत.

या रोपांची लागवड सरासरी ऑगष्ट महिन्यात केली जाते व डिसेंबर महिन्यात उत्पन्न मिळते.यंदा फुलशेती बहरली परंतु कोरोना रोगाचा प्रादुर्भाव, लॉकडाऊन, तीन जून रोजी झालेल्या चक्रिवादळामुळे फळभाजी–पाला व्यवसायावर परिणाम झाला आहे. चांगली मशागत व मेहनत यामुळे चांगले उत्पादन मिळविले आहे. त्यांनी तीन गुंठे जागेत शेवंतीची व तीन गुंठे जागेत झेंडूची (गोंडयाची) रोपे व तीन गुंठे जागेत मका लावला. उरलेल्या एक गुंठे जागेत भुईमूग तर एक गुंठ्यांत रताळी लावली आहे. तीन महिन्यानंतर त्यांना दिवसाकाठी चांगल्याप्रकारे रोजगार मिळाला आहे.

शेतात फळभाजी–पाला पीक घेताना त्यांनी शेतात रासायनिक खतांचा वापर न करता यासाठी शेतातच ६÷१० चा खड्डा तयार करून त्यात पालापाचोळा व शेणाचा वापर करून सेंद्रिय खत तयार केले.परिणामी दोन महिन्यानंतर फुलांच्या शेतीतून त्यांना दिवसाकाठी चांगल्यापैकी रोजगार मिळल्याचा एक वेगळाच अनुभव व आनंद स्वयंरोजगाराचे रहस्य सांगून जात होता !

बागायतदार शेतकऱ्यांनी आपल्या बागायतीत नारळ, सुपारी, आंबा पिकाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतात फुले, कांदा, मका व रताळी लागवड करून अंतर्गत पीक घेतल्यास स्वयंरोजगाराची वाट खुली होऊ शकते. असा विश्वास रामदास पाष्टे यांनी आमच्या प्रतिनिधी जवळ बोलताना व्यक्त केला.

# जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्यावतीने महिला पत्रकारांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्यावतीने रविवार दिनांक ०७ मार्च रोजी महिला पत्रकारांचा सन्मान करण्यात येणार आहे.

पनवेल येथील शासकीय विश्रामगृहात सकाळी ११ वाजता हा सन्मान कार्यक्रम मंचाचे अध्यक्ष माधव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने दरवर्षी रा जि प च्या विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याबरोबरच शाळांना डिटीजल करण्याच्या दृष्टीने ई लर्निंग संच, कुष्ठरुग्णांसोबत दिवाळी, कर्तृत्वान महिलांचा सत्कार, मातृभाषा दिन, ब्लँकेटचे वाटप, अन्नधान्य वाटप असे व इतर उपक्रम यशस्वीरित्या पार पाडले जातात.

सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्याबरोबरच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रींच्या लेकींचा सत्कार, महिला दिनानिमित्त विविध शासकीय विभागातील कार्यक्षम महिलांचा सत्कार करून प्रेरणा घेतली जात असतानाच महिला सक्षमीकरणाची आग्रही भूमिका मांडणाऱ्या आणि पत्रकारिता या आव्हानात्मक क्षेत्रात कुटुंबाला सांभाळून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला पत्रकारांचा सन्मान केला जाणार आहे, अशी माहिती पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचे सरचिटणीस मंदार दोंदे यांनी दिली आहे.

# अल्पवयीन मुलीस नेले फूस लावून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीस फूस लावून कायदेशीर रखवालीतून संमतीशिवाय पळवून नेल्याची घटना करंजाडे परिसरात घडली आहे.

करंजाडे परिसरात राहण–ारी १३ वर्षीय ५ महिन्याच्या एका मुलीला बदलापूर येथे राहणार्या एका इसमाने सदर मुलीला फूस लावून कायदेशीर रखवालीतून संमतीशिवाय पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस सदर इसमाचा व मुलीचा शोध घेत आहेत.

# अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवणाऱ्या पेणच्या आनंद जाधवला अटक

## उपनिरीक्षक मीनल शिंदे यांची धडाकेबाज कारवाई

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरातील फणसडोंगरी येथील एका सोळा वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणाऱ्या सत्तावीस वर्षीय विवाहित आरोपीला पेण पोलीसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी आनंद जाधव यास न्यायालयात हजर केले असता त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असे की, पेण शहरातील फणसडोंगरी येथे राहणारी सोळा वर्षीय मुलीला याच परिसरात राहणाऱ्या व विवाहित असणाऱ्या आनंद गणपत जाधव ( वय २७ ) या आरोपी ने २३ फेब्रुवारीला फूस लावून पळवून नेले होते. या बाबत मुलीच्या पालकांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. आरोपी आनंद जाधव याने आपला मोबाईल पेण मध्येच बंद केला होता. मात्र कर्तव्यदक्ष महिला पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे यांनी कोणताही पुरावा उपलब्ध नसताना मोठ्या शिताफीने तपास करत आरोपीच्या मित्रांकडून सदर आरोपी हा पुणे येथील हॉटेल मध्ये ८००० रुपये पगारावर काम करत असल्याची माहिती काढली.

यावेळी उपनिरीक्षक मीनल शिंदे यांनी आपल्या तपासाची चक्र वेगाने फिरवून सदर आरोपी हा चाकण, पुणे येथील एका हॉटेल मध्ये अल्पवयीन मुलीसह वास्तव्याला असल्याची माहिती मिळवून आरोपीला मुलीसह ताब्यात घेतले. याबाबत आरोपी आनंद गणपत शिंदे याच्या विरोधात भा.द.वि कलम ३६३, ३७६ व पोक्सो कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.


## वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.







ॲड.वसीम धुरू पटेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज.नं.२८८/२०२१
नि.नं.५/ड
ने.ता.२०/४/२०२१

Mr.RAFIQUE HASANMIYA DHATURE
Age : 50 yrs, Occ-SEND SUPPLIERS
Add : At 203, Memuna Apt. Bhusar Mohalla,
Taluka : Panvel, Dist- Raigad-410206 Applicant
V/s
PANVEL MUNCIPAL CORPORATION Respondent

ज्याअर्थी अर्जदार रफिक हसनमीया धतुरे यांचा दि.०१/०६/१९७१ रोजी मौजे : पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी जन्म झाला असून तिच्या जन्माची नोंद पनवेल महानगरपालिका यांचेकडे झाली नसल्याने तिच्या जन्माची नोंदीकरिता अर्जदार प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब पनवेल यांच्या कोर्टात सदरचा चौकशी अर्ज दाखल केला असून त्याच्या जन्माची नोंदणी बाबत कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची लागलीच कारवाई करेल आणि ते जर अर्जदार रफिक हसनमिया धतुरे जन्माचा दाखला घेण्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांच्या जन्म नोंदणींचा अर्ज मंजूर करेल याची दखल घ्यावी. आज दि.०२/०३/२०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

## ग्रामपंचायत सावळे

**ता. पनवेल, जि. रायगड**

**जाहीर सूचना सन २०२०/२०२१**

दिनांक : ०३/०३/२०२१

ग्रामपंचायत सावळे ता.पनवेल, जि. रायगड हे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील साहित्यांच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवीत आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | निविदा स्वीकारण्याची तारीख | निविदा उघडण्याचा दिनांक | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत ऑफिसमध्ये फर्निचर तयार करणे(खुर्च्या वगैरे) (१४ वा वित्त आयोग सन २०१५/२०१६ मधून) | ४२६९२/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| २ | ई लर्निंग (उदा, डिजिटल क्लासरूम, प्रोजेक्टर) (१४ वा वित्त आयोग सन २०१६/२०१७ मधून) | १५६१०७/ | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| ३ | SAM/MAN अंगणवाडीपोषण आहार देणे (१४ वा वित्त आयोग सन २०१७/२०१८ मधून) | २००००/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| ४ | रस्त्यावर दिवाबत्ती लावणे (सोलर दिवे) (१४ वा वित्त आयोग सन २०१८/२०१९ मधून) | ७९२१६/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| ५ | बोअरवेल दुरुस्ती करणे (१४ वा वित्त आयोग सन २०१८/२०१९ मधून ) | ५००००/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| ६ | आरोग्य तपासणी शिबीर व आवश्यक सेवा पुरवणे (१४ वा वित्त आयोग सन २०१९/२०२० मधून) | ४००००/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| ७ | संगणक प्रशिक्षण घेणाऱ्या १० वी ,१२ वी मुलाना संगणक प्रशिक्षण देणे (१४ वा वित्त आयोग सन २०१९/२०२० मधून) | २००००/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| ८ | समाजमंदिर सोलर राईज करणे (१४ वा वित्त आयोग सन २०१९/२०२० मधून) | २३७४४०/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| ९ | बोअरवेल सोलारवर करणे (१४ वा वित्त आयोग सन २०१९/२०२० मधून) | ३०००००/- | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |
| १० | सीसीटीव्ही बसविणे (ग्रामनिधी) | कोटेशन | ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ | ११/०३/२०२१ | १५ दिवस |

१.भरलेल्या सीलबंद निविद/कोटेशन दिनांक ०३/०३/२०२१ ते १०/०३/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
२.आलेल्या निविदा दि. ११/०३/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील .
३.मंजूर दुकानदारास वस्तू दिल्याशिवाय पैसे दिले जाणार नाहीत.
४.निविदा/कोटेशन पोष्ठाने दिनांक १०/०३/२०२१ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत ग्रामपंचायत कार्यालयामध्य पोहचतील त्यांचा विचार करण्यात येईल व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा /कोटेशन स्वीकारल्या जाणार नाहीत.
५.सदर जाहिरातीमधील अनुक्रमांक १ ते ९ नुसार मागविण्यात आलेल्या साहित्याचे,दुरुस्तीचे,उपसणे यांचे कोटेशन हे वर्षभरासाठी असेल.
६.नियमा प्रमाणे आयकर भरावा लागेल.
७.अधिकृत ठेकेदारांनी/दुकानदारांनी निविदा/कोटेशन न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.
८.कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, बिलातून कपात केली जाईल.
९.वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून/दुकानदाराकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१०. निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील .
११.निविदा/कोटेशन मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१२.निविदा/कोटेशन मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१३.सुरक्षा अनामत रक्कम ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा/वस्तूचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१४.निविदा/कोटेशन धारका कडे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.
१५.अंदाजपत्रकीय दरापेक्षा दाराची निविदा अस्वीकृत राहील.
१६.मंजूर निविदामंजूर केलेल्या प्रमाणे करणेत यावे कोणाचेही तोंडी सांगन्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
१७.कमीत कमी दाराची निविदा/कोटेशन मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.
१८.एक किवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करणेच अधिकार ग्रामपंचायतिने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रानसई धरणाची पाणी पातळी खालावली

कमी आहे. त्यामुळेही उरणच्या पाणी पुरवठ्यावर विपरीत परिणाम झाला आहे.

त्यामुळे उरणकरांना पाणी टंचाईची झळ बसणार नाही याची दक्षता घेण्याचे धोरण उरण एमआयडीसीने स्विकारले आहे.यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून शहरी व ग्रामीण भागातील पाणी पुरवठा आठवड्यातून मंगळवारी आणि शुक्रवारी असा दोन दिवस बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी उपअभियंता रंजित काळेबाग यांनी दिली आहे.

पाणी टंचाईवर मात करण्यासाठी दरवर्षी सिडकोकडून हेटवणे धरणातुन पाणी घेतले जाते. एमआयडीसी कडून दहा एमएलडी पाणी पुरवठा करण्याची मागणी केली जाते.मात्र सिडकोकडून पाच एमएलडी इतके मिळते.त्यामुळे पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आणि उरणकरांना पावसाळ्यापर्यंत सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी आठवड्यातुन दोन दिवस पाणी पुरवठा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी वाया न घालवता जपून वापर करावा असे आवाहनही काळेबाग यांनी केले आहे.

## आ.प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

आल्या आहेत. उर्वरित कंपन्या ह्या कुठल्याही संस्थेमध्ये काळ्या यादीत समाविष्ट नाहीत अथवा काळ्या यादीतून वगळण्यात आल्या बद्दलचे पुरावे या कंपन्यांनी सादर केले आहेत व त्या नंतरच या कंपन्यांची निवड महाआयटी यांनी केलेली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व शासकीय कार्यालयातील गट 'ब' (अराजपत्रित), गट 'क' संवर्गातील पदभरती आयोगामार्फत करण्याच्या प्रस्तावास काही अटींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

तसेच राज्यातील गट 'ब' (अराजपत्रीत) व गट 'क' पदांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्याबाबत 'एमपीएससी स्टुडन्ट्स राईट्स' ०४/११/२०२० अन्वये उपमुख्यमंत्री व राज्यमंत्री (सामान्य प्रशासन विभाग) यांना अग्रेषित केलेली पत्रे विभागास प्राप्त झाली आहेत. निविदेतील अटींनुसार निवड झालेल्या कंपन्यांपैकी एखादी कंपनी प्राप्त पुराव्यांनुसार दोषी आढळल्यास त्या कंपनीस निवड यादीतून कमी करण्याची तरतूद करण्यात आली आहे. भूतपूर्व दुय्यम सेवा निवड सेवा मंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोटयातील गट 'ब' (राजपत्रित) व गट 'क' संवर्गातील पदांच्या स्पर्धा परिक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय आम्हास मान्य नाही : रिलायन्स कंपनीत कायमस्वरूपी नोकरी न दिल्यास मरेपर्यंत आंदोलन

## स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचा इशारा

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे येथील रिलायन्स कंपनीने आम्हां दाखले धारकांना नोकरीत सामावून घेण्यासाठी लोकशासन समितीच्या नेतृत्वाखाली ५२ दिवस आंदोलन करूनही आमच्या पदरात काहीही पडले नाही. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२० रोजी रायगड जिल्हाधिकारी यांनी दिलेला निर्णय आम्हास मान्य नसून आम्हां प्रकल्पग्रस्तांना ठेकेदारी पद्धतीने नोकरी नको असून आमच्या हक्कानुसार कायमस्वरूपी नोकरी द्यावी अन्यथा आम्ही मरेपर्यंत आंदोलन करू असा इशारा नव्याने गठीत करण्यात आलेल्या स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने पत्रकार परिषदेत दिला आहे.



नागोठणे येथील शासकीय विश्रामगृहात सोमवारी संघर्ष समितीच्या वतीने आपल्या न्याय हक्कासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली त्यावेळी समितीचे अध्यक्ष किशोर म्हात्रे, सचिव प्रल्हाद पारंगे, संघटक गोरखनाथ पारंगे, खजिनदार मनोज पारंगे, कार्याध्यक्ष सौ. रंजना माळी, कार्यवाहक तुकाराम खांडेकर, सदस्य नारायण म्हात्रे, कृष्णा पारंगे, विठोबा माळी, विकास म्हात्रे, हनुमान जोशी, सौ. हर्षली नारायण म्हात्रे आदी उपस्थित होते.

आपली व्यथा मांडताना संघर्ष समितीने पत्रकारांना सांगितले की, १९८२ ते १९८६ दरम्यान तत्कालीन आयपीसीएल कंपनीने आमच्या जमिनी कवडीमोल भावाने विकत घेऊन आपला प्रकल्प उभारला व आम्हां प्रकल्पग्रस्तांना भूमिहीन केले. त्यावेळी आम्ही संघर्ष दिला होता. याची काँग्रेसचे तत्कालीन रोहा तालुका अध्यक्ष व विद्यमान खासदार सुनिल तटकरे यांनी दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्र पवार यांच्या समवेत प्रकल्पग्रस्त , आयपीसीएल व्यवस्थापन व जिल्हाधिकारी यांची बैठक घडवून आणली होती.

या बैठकीत मुख्यमंत्री पवार यांनी १११६ दाखले धारक प्रकल्पग्रस्तांपैकी ६१८ प्रकल्पग्रस्तांना तात्काळ नोकरी व उर्वरित प्रकल्पग्रस्तांना टप्प्याटप्प्याने नोकरी देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर ६१८ प्रकल्पग्रस्तांना आयपीसीएल व्यवस्थापनाने कायमस्वरूपी नोकरी दिली परंतु उर्वरित प्रकल्पग्रस्तांना वाऱ्यावर सोडून दिले. आयपीसीएल कंपनी रिलायन्स समूहाला विकली गेल्यानंतरही आम्हां दाखले धारक प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालाच नाही. आम्ही गेले कित्येक वर्ष लढा देत आहोत परंतु आम्हाला न्याय मिळतच नाही.

आता रिलायन्स व्यवस्थापनाने आम्हां प्रकल्पग्रस्तांना ठेकेदारी पद्धतीने कामावर घेण्यास तयारी दाखवली असली तरी आम्हास ते मान्य नाही. तत्कालीन मुख्यमंत्री पवार यांनी दिलेल्या आदेशानुसार आम्हाला रिलायन्स व्यवस्थापनाने कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेतलेच पाहिजे तो आमचा हक्कच आहे. अन्यथा आम्ही मरेपर्यंत आंदोलन करू असा इशारा स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने दिला आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकल चालकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन येथून कोप्रोली येथे जाणाऱ्या मोटारसायकल चालकाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकल चालकाचा मृत्यू झाल्याची घटना आकुर्ली येथे घडली. खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव नितीनकुमार मिठ्ठालाल देशमुख (४०) असे असून ते पनवेलमधील कोप्रोली येथे कुटुंबासह राहाण्यास होते. तसेच ते बेलापुर एनटीटी इंडीया प्रा.लि. या कंपनीत ऑपरेशन मॅनेजर या पदावर कार्यरत होते. शनिवारी मध्यरात्री ते आपल्या कामावरुन परतत होते. नितीनकुमार हे आपल्या मोटारसायकलवरुन पनवले रेल्वे स्टेशन येथून कोप्रोली येथे परतत होते. त्यांची मोटारसायकल आकुर्ली येथे आली असताना, अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. यात नितीनकुमार गंभीर जखमी झाल्याने त्यांना एमजीएम रुग्णालायत उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान, त्यांचा मृत्यू झाला. खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.


## दैनिक रायगड नगरी

वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन
(सेंट्रल रुल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**१) प्रकाशन स्थळ** : १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स टिळक रोड, जुने रतन टॉकीजवळ, पनवेल-४१०२०६, जि.रायगड
प्रकाशनाचे कालमान : दैनिक
**२) मुद्रकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**३) राष्ट्रीयत्व** : भारतीय
**४) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल-४१०२०६, जि.रायगड
**५) मालकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**६) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल-४१०२०६, जि.रायगड
**७) संपादकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**८) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल-४१०२०६, जि.रायगड

मी **सुनिल कृष्णाजी पोतदार** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.
दि.३ मार्च २०२१

**सही/-**
**सुनिल कृष्णाजी पोतदार**
**(प्रकाशकाची सही)**



ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१६२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/४/२०२१

श्रीमती.छाया अरविंद पाटील व इतर २ — अर्जदार
विरुद्ध
सौ.माधुरी अनिल परब व इतर १ — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ व ३ यांचे वडील तसेच सामनेवाले १ व २ यांचे वडील कै.श्री.अरविंद मुकूंदराव पाटील हे दि.१३/११/२०२० रोजी गोरेगाव पूर्व मुंबई येथे मयत झाले. कै. श्री.अरविंद मुकूंदराव पाटील यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मालमत्ता परिशिष्ट**
**प्लॉट नं.ई १४०, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**एकूण क्षेत्रफळ ९८.३३ चौ.मी.**
**मालमत्ता मुल्यांकन : ४,२३,६२९/-**
**(अक्षरी रुपये चार लाख तेवीस हजार सहाशे एकोणतीस मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रांसहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही.

आज दि.१/३/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.सराफ मॅडम
प्रो.जमा. ६-२५ — अर्जदाराचे वकील : ॲड.करिष्मा श. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.१२४/२०२१
ने.ता.३०/३/२०२१

श्री.रवींद्र पांडुरंग खराडे
वय : ५६ वर्षे, धंदा : शेती
रा.चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चिंध्रण — सामनेवाला

सदरचा अर्जदार हा मौजे : चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांचे आजोबा कै.दगडू मारुती खराडे, यांचा मृत्यू दि.२८/१०/१९८३ रोजी मु.चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने अर्जदार यांचे आजोबांची मृत्यूची नोंद केलेली नाही. तसेच आज रोजी अर्जदार यांचे आजोबांची मृत्यूची नोंद असलेले लेखे कुठेही नाही. तसा पंचायत समितीने व ग्रामपंचायत चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड मधून अर्जदार यांचे आजोबांची मृत्यूची नोंद नसल्याचा दाखला देण्यात आलेला आहे.

सबब अर्जदार यांनी सदरचा जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मे.कोर्टात क्रिमीनल एम.ए.नं.१२४/२०२१ दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म मृत्यू नोंदणीबाबत कै.दगडू मारुती खराडे, मृत्यू दि.२८/१०/१९८३ बाबत कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांचे आजोबांची दि.२८/१०/१९८३ मृत्यू नोंदीबाबत सर्टीफिकेट मे.कोर्टातून देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०२/०३/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



मा.मुजावर साहेब
अर्जदारांतर्फे वकील ॲड.गौरी पी.कदम

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२९०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/४/२०२१

श्री.रवींद्र रावजीराव शिंदे — अर्जदार
विरुद्ध
१) संगीता बळीराम चव्हाण
२) सुरेखा सुरेश कदम
३) वृषाली राजेंद्र कदम
४) स्वाती सुनील कदम
५) अकांक्षा विजय म्हामुणकर — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.इंदिराबाई रावजीराव शिंदे ह्यांचे दि.१०/०४/२०१७ रोजी मुंबई येथे निधन झाले. त्याअर्थी अर्जदार श्री.रवींद्र रावजीराव शिंदे यांनी कै.इंदिराबाई रावजीराव शिंदे यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत कै.इंदिराबाई रावजीराव शिंदे यांचे सदर अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत वारस सर्टीफिकेट मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. नं. | मिळकतीचे वर्णन | गाव | घर नं. | बाजारभाव | क्षेत्रफळ चौ.फू/चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कौलारु घर | कोयनावेळे | २५४ | रु.५,९०,३५७/- | १७×३१ ५२७ ४८.९७ |

वरील अर्जदार हे मयत यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्ज्रदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.इंदिराबाई रावजीराव शिंदे यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यांस वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२/०३/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मे.मुजावर साहेब
ॲड.सचिन कुलवडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.६३५/२०१९
नि.नं.१३/ड
ने.ता.१२/४/२०२१

श्रीमती.जलाजाक्षी रंगा शेट्टी
(कै.रंगा नारायण शेट्टी यांची पत्नी)
रा.रुम नं.१८०३, पायल हाईटस को.ऑप.
हौसिंग सोसायटी लि., सेक्टर १९, खारघर,
नवी मुंबई ४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.प्रकाश रंगा शेट्टी
(कै.रंगा नारायण शेट्टी यांचा मुलगा)
२) सौ.रजनी उदय शेट्टी
(कै.रंगा नारायण शेट्टी यांची मुलगी)
३) सौ.त्रिवेणी विद्याधर शेट्टी
(कै.रंगा नारायण शेट्टी यांची मुलगी) — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, कै.रंगा नारायण शेट्टी यांचे एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, नवी मुंबई येथे दि.०८/०२/२०१९ रोजी निधन झाले आहे. कै.रंगा नारायण शेट्टी यांचे अर्जदार व सामनेवाला हे कायदेशीर वारस आहेत. यांनी या कोर्टात कै.रंगा नारायण शेट्टी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत मे.कोर्टात वारस दाखला मिळावा म्हणून मो.कोर्टात अर्ज केलेला आहे.

कै. कै.रंगा नारायण शेट्टी यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**Property No.1 :**
50% Share of immovable Property Flat No.1803, 18 th Floor, Payal Heights CHS, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210 Admeasuring area about 64.378 Sq. Mtr. Built up + Terrace 4.875 Sq. Mtr. And The Value of the said property at the time of purchase was Rs.30,00,000/- (Rupees Thirty Lakhs Only)

**Property No.2 :**
50% Share of immovable Property Flat No.L-1/3:12, Plot No.22, Sector-15, Kharghar, Navi Mumbai-410210 Admeasuring area about 47.96 Sq. Mtrs. i.e. And the Value of the said property at the time of purchase was Rs.5,16,050/- (Rupees Five Lakh Sixteen Thousand Fifty only)

**Property No.3 :**
Flat No.201, 2 nd Floor, Radha Krishna Apartment, House No.1191 A,B,C & D, At-Owe, Kharghar, Navi Mumbai-410210 Admeasuring area about 403 Sq.Ft. Carpet. And The Value of the said property at the time of purchase was Rs.15,00,000/- (Rupees Fifteen Lakhs Only)

**Property No.4 :**
Flat No. 301, 3rd Floor, Payal siddhi, Plot No- 53, Sector - 27, Kharghar, Navi Mumbai, Tal- Panvel, Dist- Raigad. Admeasuring area about 601 Sq. Ft. Carpet. And The Value of the said property at the time of purchase was Rs.27,00,000/- (Rupees Twenty Seven Lakhs Only)

**Property No.5 :**
Flat No. 302, 3 th Floor, Payal Siddhi, Plot No- 53, Sector-27, Kharghar, Navi Mumbai, Tal- Panvel, Dist- Raigad. Admeasuring area about 392 Sq. Ft. Carpet. And The Value of the said property at the time of purchase was Rs. 18,00,000/- (Rupees Eighteen Lakhs Only)

**Property No.6 :** Deleted Property
**Property No.7 :** Deleted Property
**Property No.8 :** Deleted Property

**Property No.9 :**
Shop No. 2, Ground Floor, Hari Om Sai, Plot No-123, Sector- 02, Ulwe, Tal- Panvel, Dist- Raigad. Admeasuring area about 19.09 Sq. Mtr. Carpet + 6.412 Sq. Mtr Loft Area And The Value of the said property at the time of purchase was Rs.24,50,000/- (Rupees Twenty Four Lakhs Fifty Thousand Only)

**Property No. 10 :**
Shop No. 3, Ground Floor, Hari Om Sai, Plot No-123, Sector-02, Ulwe, Tal- Panvel, Dist- Raigad. Admeasuring area about 12.590 Sq. Mtr. Carpet + 4.182 Sq. Mtr Loft Area And The Value of the said property at the time of purchase was Rs. 15,50,000/-(Rupees Fifteen Lakhs Fifty Thousand Only)

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्ती हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.रंगा नारायण शेट्टी यांच्या वारसपत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२/३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



Mujawar so.
MR. MANGESH CHAVAN
Advocate for Applicants

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION),
PANVEL AT PANVEL
CIVIL M.A.NO.360/2020
Exhibit No.8/D
Next Date : 12/4/21

**1. SMT. SHEELADEVI ASHOK OBHAN**
Aged 69 years, Indian Inhabitant,
residing at Flat No.6/14, 3rd Floor, Borla Co-op.
Housing Society Ltd., Dr. C G Road, Chembur,
Mumbai 400 074
**2. MRS. PAYAL AMIT UPPAL**
**alias MS. PAYAL ASHOK OBHAN**
Aged 41 years, Indian Inhabitant,
resident at Flat No. B/159, Hazara Co-op.
Housing Society Ltd., Bhakti Dham Mandir Marg,
Opp. Everard Nagar, Chunabhatti, Soin, Mumbai
**3. MR. KAPIL ASHOK OBHAN**
Aged 36 years, Indian Inhabitant,
resident at Flat No. 6/ 14, 3tS Floor, Borla Co-op.
Housing Society Ltd., Dr. C G Road, Chembur,
Mumbai 400 074 — Applicants

WHEREAS the Applicant Nos. 1 to 3, above named have filed the present application for the grant of the Heirship Certificate, in respect of the said residential flat more particularly described in the schedule hereunder, left by the deceased Late Mr. Ashok Morchand Obhan who expired on 7th February 2012.

AND WHEREAS if any person is/are having any right, title, interest and/or benefit etc., in the schedule said flats and is/are hereby invited to submit his/her/their objection in this court within the period of 30 days from the date of the publication of this public notice.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Office No. D-1047, on the First Floor, admeasuring about 215 sq.fts., Bima Office Premises Co-operative Society Ltd., lying being and situate at Plot No. 119, Kalmboli, Taluka Panvel, District Raigad.

The flat is owned and standing in the name of Late Mr.Ashok Morchand Obhan.

AS Such if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of the publication of this public notice, the application of the applicant nos. 1 to 3 shall be allowed and the heirship certificate as prayed for shall be granted.

Given my hands and seal of this court on this 02 March 2021.

Sd/- Jr.Clerk Civil Court, S.D. Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superintendent Civil Court, S.D. Panvel



## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | क्लासिक्स सृष्टी को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.३०, सेक्टर ०३, नवीन पनवेल | २ गुलमोहर देशी | पनवेल महानगरपालिका हद्दीतील क्लासिक्स सृष्टी को. ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.३०, सेक्टर ०३, नवीन पनवेल मधील रोडवरील २ झाडे वाळवीने पोखरलेली आहेत. सदर झाडे वाळवीने मुळापासून पोखरलेली असल्याने वादळावारा झाल्यास केव्हाही पडून जिवीत व वित्तहानी होवू शकते. तरी २ गुलमोहर वृक्ष तोडणेकामी परवानगी मिळणेबाबत. |
| २ | श्री.मनोज श.गोरे, २ अ जवाहर को.ऑप.इंडस्ट्रीयल इस्टेट प्रा.लि.कामोठे, पनवेल | १ रेन ट्री, २ गुलमोहर | पनवेल महानगरपालिका हद्दीतील २ अ जवाहर को.ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट प्रा.लि. कामोठे, पनवेल येथील १ रेन ट्री, २ गुलमोहर अशी एकूण ३ झाडे अतिशय प्रमाणात वाढलेली आहेत व जास्त भार झाल्याने पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी ३ वृक्ष तोडणेकामी परवानगी मिळणेबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/वृ.पा./१००/२०२१
दिनांक : ०१/०३/२०२१

**सही/-**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# संक्षिप्त...

## शालेय जीवनातच विद्यार्थी शास्त्रज्ञ होऊ शकतात : सुनिता दांडेकर

**दै.रायगड नगरी । रोहा**

शालेय जीवनात असतानाच शाळेतील विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी भाग घेतात. त्यातून काहितरी शोध लावण्याचा प्रयत्न करतात. यात विद्युत दिवे पटवीने, पिठाची गिरण तयार करणे, विहिरीतील पाणी काढण्यासाठी यंत्र, बाष्पीभवन, आधुनिक शेती, घरगुती साधनांचा वापर, नेट, मेल, नवनवीन एप असे विविध प्रयोग करत असतात त्यामुळेच शालेय जीवनातच विद्यार्थी शास्त्रज्ञ होऊ शकतात असे विधान विज्ञान शिक्षिका सुनिता दांडेकर यांनी केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमीत्त त्या बोलत होत्या. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मधुकर फसाळे, सुनिता दांडेकर, पी.बी.मिट्टेवाड, एम.के.बांगारे, रुपाली माने, गणेश पगारे, अनिल करंजीकर, रविंद्र कान्हेकर, प्रफुल नागोठणेकर, राजाराम कुलाळ, दिगंबर मोरे, तेजस बलकावडे उपस्थीत होते. भारतीय भौतिक शाश्त्रज्ञ सी. व्ही.रमण यांनी १९२८ या दिवशी रमण प्रभाव हा शोध जाहीर केला होता. त्यांच्या सन्मानार्थ तेव्हापासून २८ फेब्रुवारी हा दिवस भारतामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो.

## खारघर शहरात पाणी समस्या तीव्र ;नागरिकांची नाराजी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एकीकडे उन्हाळ्याचे दिवस जस जसे जवळ येत आहेत तस तशी खारघर शहरातील पाणी समस्या आणखी तीव्र होत चालली आहे.मागील आठवड्यात रहिवाशांनी अपुऱ्या पाणीपुरवठ्यावरून सिडको विरोधात काढलेल्या मोर्चाचा काहीच उपयोग होताना दिसत नसुन शहरातील नागरिक या समस्येने अक्षरशः हैराण झाले आहेत.

शहरात १०,११,१२,१३,१५,१९,२१ याठिकाणी पाण्याची समस्या गंभीर आहे.यासंदर्भात सिडको पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी करून देखील काहीच उपयोग होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.सेक्टर १९ मध्ये तर मोठ्या प्रमाणात पाण्याचा तुटवडा जाणवत आहे.दिवसातून काही तासभर पाणी सिडको मार्फत पुरवठा केला जातो.अशी समस्या यापूर्वी कधी उद्भवली नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे.सध्याच्या घडीला कोणतेही काम सिडकोने हाती घेतले नसताना अपुर्या पाणीपुरवठ्याचे कारण काय आहे ?असा प्रश्न नागरिक व्यक्त केला.अशीच तक्रार सेक्टर १५ सिडकोने उभारलेल्या स्पॅगेटी गृसंकुलात आहे.येथील प्रिंयदर्शनी हौसिंग सोसायटी मधील ३३६ सदनिका धारकांना अपुर्या पाणीपुरवठ्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत असल्याने येथील रहिवाशांनी सिडकोला आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# कामोठे जंक्शनवरील सिग्नलला वाहतूक पोलिसांच्या रेड सिग्नल ; सिग्नल बसूनही ते कार्यान्वित होईना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल सायन महामार्गावर कामोठे जंक्शन येथे नवीन सिग्नल यंत्रणा बसवण्यात आली आ-हेत. सामाजिक कार्यकर्ते सचिन गायकवाड यांच्या पाठपुराव्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने सिडकोकडे पैसे वर्ग केल्यानंतर हे काम हाती घेण्यात आले. परंतु वाहतूक पोलिसांकडून हे सिग्नल सुरू करण्यासाठी हिरवा कंदील मिळत नसल्याने. परिस्थिती जैसे थे असून अपघात नियंत्रण आणि वाहतूक कोडींला आळा बसला नाही. याबाबत त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी गायकवाड यांनी केली आहे.



पनवेल सायन महामार्गावरील कामोठे लेफ्ट टर्न दोन वर्षापुर्वी सुरू झाला आहे. त्यामुळे येथून मुंबईच्या दिशेने वाहने जोरदारपणे धाव-तात. त्याबरोबर मुंबईकडून येणारे वाहने पुल-ाखालून वसाहतीत जातात. कामोठेतून कळंबोली किंवा पनवेलकडे जाण्यासाठीही याच ठिकाणाहून जावे लागते. त्यामुळे कामोठे प्रवेशव्दारावर जंक्शनचे स्वरूप प्राप्त झाले असे म्हटले तर चालेल. येथे खुप मोठी रहदारी असते. वाहने सुध्दा जास्त असल्याने वाहतुक कोंडी होते. तसेच लहान मोठे अपघात सुध्दा घडतात. येथे असलेले सिग्नल बंद असल्याने वाहतुक सुरळीत होत नाही. सकाळ संध्याकाळी वाहतूक कोंडी सुद्धा होत आहे. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. त्याचबरोबर कळंबोली कामोठे जोड रस्ताही प्रस्तावित आहे. त्यामुळे पूर्वी या ठिकाणी अस-लेले सिग्नल पुन्हा कार्यन्वित करा अशी मागणी सचिन गायकवाड यांनी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने ही यंत्रणा सिड़कोकड़े हस्तांतरीत करण्याकरीता पत्र दिले होते. याकरीता येणारा खर्च देण्यास तयार असल्याचेही त्या पत्रात सांगण्यात आले होते. परंतु सिडकोकडून तळयात आणि मळयात भूमिका घेण्यात आली होती. मात्र गायकवाड़ यांनी मुख्य अभियंता यांच्याकडे पाठपुरावा केला. सिडकोने देखभाल करावी अशी मागणी त्यांनी केली. त्याप्रमाणे रिलॅबल या एजन्सीच्या मार्फत कामोठे सिग्नलची तपासणी करण्यात आली . त्यांच्याकडून सिडकोच्या विद्युत आणि मेट्रो विभागाला खर्चाचा तपसील सादर करण्यात आला. त्याप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविण्यात आले होते. सिडकोने पुन्हा पत्र देऊन यासाठी ३३ लाख ५७५५६ रुपयांची मागणी केली होती. त्यानुसार निधी मंजूर करण्यात आला आणि तो निधी सिडकोकडे वर्ग करण्यात आला. त्यानंतर प्राधिकरणाने सिग्नल यंत्रणा बसवली. परंतु ते अद्यापही कार्यान्वित करण्यात आले नाही. कळंबोली वाहतूक शाखेकडून हे सिग्नल बंद ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे ज्या कारणासाठी हे सिग्नल बसविण्यात आले आहेत. त्याचा उपयोग अद्यापही झाला नाही.

दरम्यान पनवेल सायन महामार्गाचे काम पन-वेल सायन टोल वेज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला देण्यात आले होते. बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वानुसार हे काम संबंधित कंपनीने करणे अपेक्षित होते. मात्र २९ डिसेंबर २०१७ ला हे काम सोडून कंपनी बाजूला झाली. छोट्या वाहनांना टोलमाफी दिल्याने सहाजिकच टोल वसुली कमी झाली. या सर्व गोष्टींमुळे अनेक कामे रखडली. त्यामध्ये कामोठे जंक्शन वरील सिंगल यंत्रणेचाही समावेश होता. दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी शिल्लक नसल्याने सिग्नल यंत्रणा धूळ खात पडून होती. मात्र सचिन गायकवाड यांनी पोटतिडकीने केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत. तसेच वस्तुस्थिती पाहता लेखाशिर्षातुन पैसे सिडकोला देण्याचा निर्णय घेण्यात आला. अविश्रांत मेहनत आणि अखंडित पाठपुराव्यामुळे सिग्नल यंत्रणा बसवण्यात आली असली तरी ती कार्यान्वित करण्यात आली नाही. त्यामुळे गायकवाड यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी यंदा सुध्दा रस्ता सुरक्षा अभियान आयोजित केले. यानिमित्ताने विविध कार्यक्रम व उपक्रम पार पडले. वाहतूक पोलिसांनी वाहतुकीच्या नियमांविषयी जनजागृती आणि प्रबोधन केले. रस्ता सुरक्षा अभियान राबवले जात असताना पनवेल सायन महामार्गावर असलेल्या कामोठा जंक्शन वरील नव्याने बसविण्यात आलेल्या सिग्नल यंत्रणेला कार्यान्वित करण्यासाठी कळंबोली वाहतूक शाखेकडून परवानगी मिळत नाही. याबाबत आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

# नागोठणे पोलीसांनी गुन्ह्यातील पाहिजे आरोपीस तब्बल २० वर्षा नंतर शोध घेऊन केले अटक

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पोलीस अधिक्षक अशोक दुधे, तसेच अप्पर पोलीस आधिक्षक सचिन गुंजाळ, यांनी फरारी पाहिजे आरोपी यांचा शोध घेणेसाठी खास मोहीम काढून आरोपी अटक करण्याबाबत आदेशित केले होते.

त्याप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा किरणकुमार सूर्यवंशी सो. यांचे सूचनेप्रमाणे नागोठणे पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटूकडे यांनी पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार पथकास योग्य ते मार्गदर्शन करून पाहिजे फरारी आरोपींना अटक करण्याबाबत आदेशित केले होते.

नागोठणे पोलीस ठाणे गु.र.न. ५६/२००० भा.दं.वि.संकलम १४३, १४७, ४५२ मधील तब्बल वीस वर्षे दोन आरोपीत हे बेपत्ता होते. सदर गुन्हयातील पाहिजे फरारी आरोपीत नामे सुरेश मारुती सकपाळ वय-५९ वर्षे, रा. वावळोली ता. सुधागड पाली, जिल्हारायगड हा मागील २० वर्षा पासून सदर गुन्ह्यात फरार होता त्याचे विषयी पोह/७५१ संतोष रामचंद्र म्हात्रे यांना गुप्तबातमीदारा मार्फतमाहिती प्राप्त झाली असता,त्याचा शोध घेणेकरीता पोह/७५१ संतोष रामचंद्र म्हात्रे व पोह/१०४९ विनोद मारुती पाटील, यांचे पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटूकडे यांनी पथक तयार करुन त्यांना वर नमूद पाहिजे आरोप-ीताचा शोध घेणेकारिता रवाना केले असतावर नमूद पथकाने त्याचे विषयी वावळोली गावातील पोलीस पाटील यांचेकडून खात्री करुन घेवून आरोपीच्या वर नमूद पत्त्यावर त्याचा शोध घेऊन त्यास दिनांक ०१/०३/२०२१ रोजी ताब्यात घेवून तब्बल २० वर्ष नंतर नमूद गुन्ह्यात अटक केले आहे.

सदर कारवाई पार पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक अशोक दुधे, तसेच अपर पोलीस आधिक्षक सचिन गुंजाळ यांच्या सूचनेप्रमाणे उप विभागीय पोलीस अधिकारी रोहा किरणकुमार सूर्यवंशी व नागोठणे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटूकडे यांच्या मार्गदर्शनाखालीपोह/७५१ संतोष रामचंद्र म्हात्रे, व पोह/१०४९ विनोद मारुती पाटील, नागोठणे पोलीस ठाणे यांनी उत्कुष्ठ कामगिरी केली आहे.

# आदगाव किनारी शार्क माशाला दिले जीवदान

**दोन दिवस होता किनाऱ्यावर; मच्छीमार, वनविभागाने केली सुटका**



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव समुद्रकिनारी आलेल्या अवाढव्य शार्क माशाला येथील वनविभाग व मच्छीमारांनी जीवदान दिल्याची घटना मंगळवारी घडली आहे. आदगावकरांनी आपले जाळे फाडून नुकसान सहन करीत त्याची सुटका केल्याची माहिती समोर येत आहे.

तालुक्यातील सर्वा मार्गे दिघीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सायंकाळच्या वेळी आदगाव समुद्रामध्ये होणाऱ्या भरती - ओहोटीमुळे किनाऱ्यावर आलेल्या जवळपास दहा फुटापेक्षा जास्त लांबीच्या अवाढव्य शार्क व्हेल माश्याला पुन्हा सुखरूप समुद्रामध्ये सोडण्यात आदगाव येथील बाळकृष्ण पावशे, मधुकर दोडकुलकर, लाया दोडकुलकर, धनेश चोगले व काशिनाथ चोगलेसह आठ ते दहा कोळी बांधवांना दोन दिवसांच्या अथक प्रयत्नांनी यश आले आहे.

श्रीवर्धन मधील भरडखोल, आर-ावी, दिवेआगर या समुद्रकिनाऱ्यावर मागील काळात मृत मासा सापडलेल्या अनेक घटना घडल्या आहेत. मात्र, यावेळी आदगाव येथील किनाऱ्यावर आलेल्या जिवंत शार्क माश्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. सोमवारी पहिल्या दिवशी किनाऱ्यालगत सुमारे १२ ते १५ फुटांचा शार्क व्हेल मासा शरीराच्या हालचाली कमी होत असताना पाण्यात जाण्यासाठी धडपडत असल्याचे पहावयास मिळाले. लगेचच किनाऱ्यावरील कोळी बांधवांनी एकत्र येत त्याला पाण्यात सोडण्याचे साहस दाखवले. त्यांनतर त्याच्या शरीराच्या हालचाली सुरू झाल्या. मात्र, दुसऱ्या दिवशी मंगळवारी हाच मासा बंदरातील आतील भागात जाळ्यात अडकून सुटके साठी धडपडत असल्याचे दिसले. याची माहिती वनविभागाला समजताच एम. डी राऊत, एस.के. उतेकर, एस. डी. ठाकरे, बी. पी. राठोड या वनविभाग अधिकारी व कर्मचारी यांनी घटना स्थळी भेट दिली.

त्यावेळी परत एकदा येथील सर्व मच्छिमारांनी एकत्र येत त्याच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. त्याच्या शरीरा भोवती लपेटलेले जाळे त्याला कुठलीही इजा न करता सुखरूप पणे काढण्यात आले आणि तो पाण्यात दिसेनासा झाला.

# भाजपच्या पाठपुराव्याला यश ; कामोठेमध्ये लवकरच जलकुंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे मधील पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजपचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केलेल्या मागणी व सततच्या पाठपुराव्याला यश आले असून लवकर या संदर्भातील प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

आमदार प्रशांत ठाकूर सिडको अध्यक्ष असताना कामोठे येथील पिण्याच्या पाणी संदर्भात नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी सिडकोमध्ये पाणी पुरवठा विभागाच्या बैठकीत कामोठ्यात जलकुंभ उभारण्याची मागणी करून ते काम लवकरात लवकर करण्याची मागणी केली होती. यावेळी तत्कालीन अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मागणी मान्य करत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तशा सूचना केल्या होत्या. सिडकोकडून हे काम लवकरात लवकर व्हावे यासाठी डॉ. अरुणकुमार भगत यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला. नुकताच त्यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता बनकर यांना या कामासंदर्भात विचारणा केली असता येत्या एक ते दिड महिन्यात एमबीआर अर्थात जलकुंभ उभारण्याची निविदा प्रसिद्ध करण्यात येऊन काम लवकरात लवकर सुरु करण्याचे आश्वासन दिले आहे. या एमबीआरला हेटवणे लाईन जोडण्यात येणार असून दोन सेशनमध्ये पाणी वितरण होऊन पाणी पुरवठा सुरळीत होणार आहे.

> कामोठे मधील नागरिकांना सुरळीत व मुबलक पाणी पुरवठा झाला पाहिजे, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोकडे पाठपुरावा करीत आहे. सिडकोचे अध्यक्ष असताना त्यांनी तात्काळ मान्यता देऊन या कामासंदर्भात मार्गदर्शक सूचना केल्या. कोविड व इतर तांत्रिक कारणामुळे मधल्या काळात थोडा उशीर झाला. पण अखेर या कामाला लवकरच सुरुवात होत आहे. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर व सिडको अधिकाऱ्यांचे आभार मानतो.
>
> **-डॉ. अरुणकुमार भगत, नगरसेवक- पनवेल महानगरपालिका**

# वॉर रूम हेच घर : अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर

**महापालिकेचे नियमित चालणारे काम प्रचंड असते त्यातच हे करोनाचे संकट ओढवल्याने खूप मोठी जबाबदारी पालिकेवर येऊन पडली. पनवेल महापालिकेची स्थापना होऊन थोडाच काळ झाल्याने कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादित असल्याने कामाचे नियोजन करणे अवघड होत होते. असे असताना देखील पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली प्रशासन अधिक गांभीर्याने करोना काळात आघाडीच्या सैन्यफळीसारखे लढायला लागले. त्यातच प्रामुख्याने नव्याने रूजू झालेल्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनीही कामाला जोमाने सुरुवात केली. याआधीचा कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई महानगरपालिकेतील प्रशासकीय अनुभव त्यांच्या गाठीशी होता, तो या ठिकाणी उपयोगी आला.**

आयुक्तांच्या सूचना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवत त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी जातीने लक्ष दिले. एका बाजूला नियम राबवायचे त्याचबरोबर नागरिकांत असंतोष पसरू नये, याची काळजी घ्यायची, अशा दुहेरी भूमिका त्यांना पार पाडाव्या लागत होत्या. पनवेल हे मुंबईचे प्रवेशद्वार आहे. पूर्ण रायगड जिल्ह्याचा करोना रूग्णांचा भार पनवेल महापालिकेवर होता. त्यामुळे इथे घेतलेला निर्णय कोकणच्या एकूण आरोग्याशी निगडीत होता, हे ओळखून पनवेल महापालिकेने अत्यंत जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने कार्य केले.

श्रीमती सांडभोर यांनी त्या त्या स्तरावर महापालिकेतील सर्वच विभागांशी समन्वय साधून नागरिकांची गैरसोय होणार नाही, याकडे विशेष लक्ष दिले. आयुक्त सुधाकर देशमुख यांनी प्रशासनाला एक टिम म्हणून अधिक गतिमान तर केलेच परंतु या टिमला प्रोत्साहित करण्याचे, त्यांचा उत्साह वाढविण्याचे काम तृप्ती सांडभोर यांनी अगदी लीलया केले. रूग्णांचे संपर्क,चाचणी, ट्रेसिंग,



डिस्चार्च यांच्या व्यवस्थापनावर त्यांनी विशेष भर दिला. करोनाचे व्यवस्थापन करण्यासाठी 'वॉर रूम' हेच त्यांचे कार्यालय आणि घर झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालय यंत्रणा, पालिका आणि इतर विविध विभागांशी समन्वय साधण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. याचबरोबरीने रूग्णांची माहिती अद्ययावत करणारे सॉफ्टवेअर वापरून रूग्णांसाठी बेडस् चे उपलब्ध करण्याचे अतिशय क्लिष्ट काम त्यांनी हाताळले. त्यामुळे अधिकाधिक रूग्णांना सहज बेडस् उपलब्ध होऊ लागले, पर्यायाने रूग्णांचे होणारे कष्ट कमी झाले. करोना रूग्णसंख्येचे अचूक विश्-लेषण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे काम आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी केले.

करोनाकाळात बाहेरून आलेल्या नागरिकांचे संस्थात्मक विलिगीकरण करण्याची मोठी जबाबदारी पनवेल महानगरपालिकेवर होती. पालिकेने इंडिया बुल्सची इमारत संस्थात्मक विलगीकरणासाठी घेतली होती. येथील रूग्णांना सोयी-सुविधा पुरविण्याची मोठी जबाबदारी श्रीमती सांडभोर यांनी पार पाडली. रुग्णांच्या बाबतीत कोणतीही हयगय होऊ नये, याची सर्वोतोपरी काळजी त्यांनी घेतली.माझे कुटुंब माझी जबाबदारी लोकांमध्ये रूजण्यासाठी घरोघरी जाऊन आरोग्य तपासणीचे नियोजन केले. त्याचा सातत्याने आढावा घेण्याचे काम श्रीमती सांडभोर यांनी केले. विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन नागरिकांमध्ये जनजागृतीचे काम त्यांनी केले. विशेषत: करोना पॉझीटिव्ह येणाऱ्या रुग्णांची संख्या ज्या ठिकाणी जास्त आहे अशा इमारती सील करून करोनाची साखळी तोडण्यावर त्यांनी भर दिला. हे सगळे काम करताना स्वत:ला आणि आपल्या कुटुंबाला करोनाची लागण होऊनही कच न खाता, न डगमगता त्यातून बाहेर पडून त्यांनी अधिक उत्साहाने पुन्हा काम सुरू केले.

करोनाचा संसर्ग आटोक्यात येतानाच पनवेल शहरातील विकासकामे जलदगतीने सुरू करून पूर्ण करायचे लक्ष्य त्यांच्यासमोर होते. शासनाची अमृत योजना, प्रधानमंत्री आवास योजना, यांसारखे महत्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी हाताळले. महानगरपालिकेचे बांधकाम विभागाचे विविध प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्यासाठी नियोजन करून कामाची गुणवत्ता आणि गती यातील योग्य मेळ त्या साधत आहेत. सामाजिक भान राखत महिला व बालकल्याण विभागाचे धोरण त्यांनी आखले आहे. अजूनही करोना नियंत्रणाबरोबरच आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका टीमला सोबत घेऊन इतर विकासकामे प्रगतीपथावर नेण्याचे श्रीमती सांडभोर यांचे अविरत प्रयत्न सुरू आहेत.

**लेखन**
**श्रीमती.वर्षा कुलकर्णी**
**जनसंपर्क अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# डॉ.सी.डी.देशमुख महाविद्यालयाचे प्रा. अनिल शिंदे डॉक्टरेक्ट सन्मानित

**दै.रायगड नगरी । रोहा**

कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य आणि सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा. अनिल निवृत्ती शिंदे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून नुकतीच डॉक्टरेट (झह.ऊ) पदवी प्रदान करण्यात आली. प्राचार्य डॉ. सदानंद गोने (लातूर) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. अनिल शिंदे यांनी रायगड जिल्ह्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार एक भौगोलिक अभ्यास या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले आहे. यावेळी बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे (जळगाव) उपस्थित होते. या कार्यक्रमास डॉ. मगरे (धुळे), प्रा. डॉ. बी. एस. जाधव (कोल्हापूर), प्रा. डॉ. के. आर. जाधव (कोल्हापूर), विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. मुंढे, डॉ. पराग खडके, प्राचार्य डॉ. माळी (लातूर ), प्राचार्य हरिदास राठोड, डॉ. कनकुरे, डॉ. धनेश्वर (चाकूर), डॉ. काळगापुरे, डॉ. पद्माकर गोने, विद्यापीठाचे सिनेट सदस्य युवराज पाटील तसेच अनेक प्राध्यापक वर्गासह मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

प्रा. अनिल शिंदे यांच्या यशाबद्दल कोकण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. संजयभाई पाटील, कार्यवाह मा. अजीतभाई शहा, सदस्य मा. हेमंत गांगल, महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. संदीप गांगल, प्राचार्य डॉ. माळी (लातूर), प्राचार्य हरिदास राठोड, डॉ.कनकुरे, डॉ. धनेश्वर (चाकूर), डॉ. काळगापुरे, मुंबई विद्यापीठाच्या माजी विभाग प्रमुख सौ. सविस्मिता चव्हाण, प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, प्राचार्य डॉ. दिपक रावेरकर (पोलादपूर) , प्राचार्य महाजन, प्राचार्या डॉव. अनिता आवटी (खेड) यांच्यासह विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. डॉ.अनिल शिंदे यांनी रोह्यासारख्या ग्रामीण भागातील डॉ.सी.डी. देशमुख महाविद्यालयात शिकवायला सुरुवात केल्यापासून अनेक विद्यार्थी भूगोल विषयात आता तज्ञ झाल्याचे दिसते. कठीण विषय सोपा करुन दाखविण्याची पद्धत त्यांच्याकडे अवगत आहे. त्यांनी शिकविलेले हजारो विद्यार्थी आज शाळांमध्ये शिक्षक, प्राध्यापक पदावर शिकविण्याचे काम करीत आहेत.